

18


**संपादक**
अभय कांता*
शरद नावरे
प्रज्ञा दया पवार
सुरेंद्र जोंधळे

**कार्यकारी संपादक**
देवेंद्र इंगळे

**संपादक मंडळ**
दिलीप चव्हाण, माधुरी दीक्षित, नारायण भोसले, मिलिंद कीर्ती, वृषाली मगदूम, प्रज्वला तट्टे, कलीम अजीम, अनिल जायभाये

**सहव्यवस्थापक**
दीपक कसाळे



**संपर्क पत्ता**
५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ, फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११
भ्र. ७७७६९०२२६७
इमेल : pwatsaru@yahoo.com
वेबसाईट : www.pvatsaru.com



**वर्गणीचे दर** : वार्षिक : ४५० रु., त्रैवार्षिक : १२०० रु., दशवार्षिक : ३,५०० रु., सॉफ्ट कॉपीसाठी वा. व. ३५० रु., सॉफ्ट + छापील ६५० रु. वरील पत्त्यावर इ मनी ऑर्डर, चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी. 'परिवर्तनाचा वाटसरू' या नावाने चेक/डिमांड ड्राफ्ट असावा.
बँक ट्रान्सफरने वर्गणी भरण्यासाठी तपशील
बँक ऑफ इंडिया, फर्ग्युसन कॉलेज रोड शाखा, पुणे
बचत खाते : **परिवर्तनाचा वाटसरू**
बचत खाते क्र. : 051410110013969
आयएफएससी क्र. : BKID0000514
एमआयसीआर क्र. : 411013014

*पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी

परिवर्तनाचा
# वाटसरु

वर्ष १८ वे / अंक ३ रा
किं. २५ रु. / १ ते १५ जून २०१८

ISSN: 2250-3145

परिवर्तनाचा
# वाटसरू

## अनुक्रम

### इपीडब्ल्यूची पानं


निर्णयकर्ते राज्यपाल ५
भारतीय राजकारणातील सरंजामशाही ७
चकमकीच्या नावाखाली जनसंहार ८
बनावट वाद १०
काश्मिरची समस्या सुधारणेच्या पलीकडे? १२
'ऐतिहासिक चुकी'ची ७० वर्षं १४


अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.


**समसामायिक**

युपीएससीत बदल : काँग्रेसची आवई १७
प्रकाश बाळ

कर्नाटकचा त्रिशंकु आणि अनिर्णित निकाल २२
वैशाली पवार

न्यायिक अत्याचार ३०
आनंद तेलतुंबडे

**विशेष लेख**

आदित्यनाथ यांच्या राज्यातील एनकाउन्टर्सचं इतिवृत्त ३५
नेहा दीक्षित

**'अर्था'र्थ**

जागतिक भांडवलशाही व कामगार वर्ग ५२
संजीव चांदोरकर

**कविता**

माया पंडित ५८

**पुस्तक ओळख**

वर्तमानाचे भान सजग करणारे पुस्तक ६८
नितिन जरंडीकर

**बाप्टिस्ट नोंदी**

भारतीय समाजवादी चळवळीसमोरील वर्ण-जातिव्यवस्थेचे आव्हान ६
राम बापट





# कर्नाटकचा त्रिशंकु आणि अनिर्णित निकाल

वैशाली पवार

२०१८च्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीमध्ये जागा आणि म यांच्यातील संबंध पूर्णपणे बदलले. भाजपने कमीत कमी मतांवरु जास्तीत जास्त जागा मिळविण्याची कामगिरी केली. भाजप आणि काँग्रेसमध्ये दोन टक्के मतांचा फरक आहे. दोन टक्के कमी म असूनही भाजपने काँग्रेसपेक्षा सव्वीस ज़ागा जास्त जिंकल्या. भाजप निवडणूक व्यवस्थापनाचे सूत्र नियोजनबद्ध वापरल्याचे दिसते.

भाजपच्या तुलनेत काँग्रेस पक्षाला निवडणूक व्यवस्थापन कर आले नाही. व्यवस्थापनाचा संबंध नेतृत्वाशी घट्टपणे जोडलेला आहे संघ परिवार, नरेंद्र मोदी, अमित शहा या तिघांची निवडणू व्यवस्थापनाची क्लुप्ती काँग्रेसपेक्षा सरस ठरली. तर राहूल गांधी सिद्धरामय्या यांची निवडणूक व्यवस्थापनाची क्लुप्ती प्रभावी ठर नाही. यामुळे राहुल गांधी, सिद्धरामय्या यांच्या संघटन पद्धतीवर प्र उपस्थित झाले.

राहुल गांधी यांचे नेतृत्व पराभूत ठरल्याची राष्ट्रीय पातळीवर च झाली. ही निवडणूक जरी राष्ट्रीय पातळीवरील २०१९च्या निवडणुकीच संदर्भातील लिटमस टेस्ट असली, तरी ही निवडणूक विशिष्ट अ प्रदेशातील होती. त्या प्रदेशातील हितसंबंधांची या निवडणुकी स्पर्धा झाली.

काँग्रेस, भाजप, जनता दल हे पक्ष वेगवेगळ्या हितसंबंध प्रतिनिधित्व करत होते. काँग्रेसने वोक्कलिग व लिंगायतेतर समूहांच हितसंबंधांचा दावा केला. तर भाजपने लिंगायत आणि हिंदू यांच हितसंबंधांचा दावा केला. जनता दलाने वोक्कलिग, अनुसचित जात मुस्लिम यांच्या हितसंबंधांचा दावा केला. यामुळे ही निवडण सामाजिक घटकांची जुळवाजुळव करणारी होती.

तसेच प्रस्थापित हितसंबंध आणि नव्याने सत्तेत प्रवेश करणारे यांच्यातील संघर्ष या निवडणुकीत झाला. म्हणून या निवडणुकीबा जुळवा-जुळवीच्या संदर्भात काँग्रेस अपुरी ठरली. तर भाजप आ जनता दल यांची जुळणी काँग्रेसपेक्षा वरचढ ठरली. हा मुद्दा आधा रिअल इस्टेट, सामाजिक गटांची जुळणी या तीन पद्धतीने समजून घे येतो.

तसेच विभागनिहाय निकालांवरूनदेखील पक्ष, विभाग, सामाजि गट यांच्यातील जुळणी ही अत्यंत गुंतागुंतीची बाब होती असे दिस या मुद्यांची चर्चा प्रस्तुत लेखात केली आहे.

लेखिका पुणेस्थित श्री शाहू मंदिर महाविद्यालयात राज्यशास्त्राच्या सहाय्यक प्राध्यापक आहेत.
इमेल pawarvaishali06@gmail.com

**विधानसभा निवडणुकीतील पक्ष, जागा व मतनिहाय वर्गीकरण (२०१८)**

| पक्ष | जागा | मतं |
|---|---|---|
| भाजप | १०४ | ३६.२ |
| काँग्रेस | ७८ | ३८ |
| जनता दल (ध) | ३७ | १८.३ |
| बीएसपी | ०१ | ०.३ |
| अपक्ष | ०१ | ३.९ |

## त्रिकोणी स्पर्धा

कर्नाटकामध्ये त्रिकोणी स्पर्धा होती. या त्रिकोणी स्पर्धेमध्ये भाजप आणि नरेंद्र मोदी इतरांच्या तुलनेत जास्त प्रभावी ठरले. त्रिकोणी स्पर्धेत प्रभावी ठरणारे नरेंद्र मोदी हे एक नेतृत्व उदयाला आले आहे. यामुळे संपूर्ण राज्यामध्ये गैरभाजप अशी आघाडी झाली नाही. गैरभाजप अशी आघाडी झाली असती तर भाजपला राज्यात यश मिळाले नसते. बिहारमध्ये त्रिकोणी स्पर्धा न होता, काँग्रेसविरोधातील दोन मुख्य पक्ष एकत्रित आले होते. त्यामुळे तेथे भाजपाचा पराभव झाला होता. मर्मता बॅनर्जीनी याच मुद्यावर भर दिलेला दिसतो. जनता दल या पक्षाला मायावतींशी केलेल्या युतीचा फायदा झाला. यामुळे मायावती काँग्रेस पक्षाच्या पराभवाचे एक कारण आहेत. परंतु केवळ मायावतींनी काँग्रेसला पाठिंबा दिला असता, म्हणून काँग्रेसला यश मिळाले नसते. कारण गैरभाजपवादी पक्षांची युती झाली तर त्रिशंकु स्पर्धा मोडीत निघते. अन्यथा ती स्पर्धा मोडीत निघत नाही.

## जनता दलाची व्यूहनीती

म्हैसूर-कर्नाटकमध्ये जद हा वर्चस्वशाली पक्ष आहे. परंतु तो गेल्या दहा वर्षात सत्तेपासून दूर राहिला. त्यामुळे या पक्षाने या निवडणुकीत राज्याच्या राजकारणात प्रभावशाली होण्यासाठी आघाडी करण्याची व्यूहनीती वापरली. जदने वापरलेली आघाडीची व्यूहनीती हे काँग्रेसच्या राज्यातील ऱ्हासाचे एक महत्त्वाचे कारण ठरले. कारण राज्याच्या निवडणूक आखाड्यात आरंभी काँग्रेस वरचढ पक्ष होता. मात्र जदने व भाजपने सामाजिक आघाड्या करत ताकद वाढवली. त्यामुळे कर्नाटक निवडणुकीत भाजप सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला. शिवाय दक्षिणेकडेही पक्षाने दमदार शिरकाव केला. निवडणूक जिंकण्यासाठीची भाजपची रणनीती आक्रमक आणि तळागाळापर्यंत पोचणारी होती. नरेंद्र मोदींचे संभाषण कौशल्य त्यांच्या कामास आले. शिवाय त्यांनी इतिहासाचा साधन म्हणून कौशल्याने उपयोग करून घेतला. रणनीतीला प्रत्यक्ष कृतीमध्ये भाजपने उतरविले. कर्नाटकाची निवडणूक काँग्रेस विरुद्ध भाजप अशी होती. त्यामध्ये काँग्रेस चढाओढीत सुरुवातीला पुढे होती. परंतु भाजपने काँग्रेसला या निवडणुकीत एकटे पाडण्यास सुरुवात केली. तेव्हापासून निवडणूक काँग्रेसच्या हातून सुटत गेली व भाजपकडे सरकली. भाजप विरोधी पक्षांपैकी बसपा, जद यांची काँग्रेस विरोधी आघाडी म्हणजे काँग्रेसची राजकीय कोंडी. आपली राजकीय कोंडी होते आहे हे पक्षाच्या लवकर लक्षात आले नाही. असदुद्दीन ओवैसी यांचा एमआयएम आणि सोशल डेमॉक्रटिक पार्टी ऑफ इंडिया (एसडीपीआय) या दोन पक्षांनी काँग्रेस विरोधी भूमिका घेतली. शिवाय डॉ. नौहेरा शेख यांच्या महिला एम्पॉवरमेन्ट पार्टी या पक्षाने उमेदवार उभे केले. यामुळे दलित आणि मुस्लिम मतांचे विभाजन झाले. या दोन समाजांच्या भूमिकेमुळे काँग्रेस पक्ष अडचणीत आला. याउलट भाजपने हिंदूंमध्ये हिंदू अस्तित्वभान कायम राहील, अशी रणनीती वापरली. तर काँग्रेसकडे जाणारी अनुसूचित जाती आणि मुस्लिमांची हिंदुत्व विरोधी मतपेटी जनता दल, बसपा, महिला एम्पॉवरमेन्ट पार्टी, एमआयएम आणि सोशल डेमॉक्रटिक पार्टी ऑफ इंडिया या पक्षांकडे वळली. याचा फटका काँग्रेसला खूप मोठा झाला. म्हणून काँग्रेसच्या ऱ्हासाचे एक कारण सामाजिक समझौता करण्यास आलेले अपयश हे दिसते. मुंबई-

बंधूंना पाठिंबा होता. तसेच रेड्डींचाही येडियुरप्पांना पाठिंबा होता. म्हणजेच लिंगायत समाज हा वर्चस्वशाली समूह आहे. लिंगायत समाजातील प्रगत वर्ग रिअल इस्टेटच्या क्षेत्रात उतरलेला आहे. कर्नाटकात लिंगायत समाजाची १७ टक्के लोकसंख्या आहे. तसेच कर्नाटकामध्ये ५०० स्थानिक मठांना अमित शहा यांनी भाजपकडे वळविले. प्रचारात राहूल गांधींनीदेखिल १९ मंदिरांमध्ये दर्शन घेतले. रिअल इस्टेटच्या संदर्भात हिंदू ओळख, हिंदुत्व यापेक्षा भौतिक हितसंबंध जास्त महत्त्वाचे होते. कारण सिद्धरामय्या यांनी मठांच्या आणि मंदिरांच्या स्वायत्ततैवर नियंत्रणे आणली होती. मठांशी संबंधित दवाखाने, शाळा, कॉलेज, अभियांत्रिकी, वैद्यकीय शिक्षण, आश्रमशाळा असा संस्थात्मक पसारा आहे. यांना येडियुरप्पांनी त्यांच्या काळात अनुदान दिले होते. याउलट सिद्धरामय्यांच्या काळात मठांचे शैक्षणिक आणि भौतिक हितसंबंध अडचणीत आले. त्यांनी लिंगायतांच्या धार्मिक दर्जापेक्षा शैक्षणिक, भौतिक आणि राजकीय सत्ता या तीन गोष्टींना महत्त्व जास्त दिले. त्यांनी कर्नाटकाचे राजकारण घडविले. बंगळूरू केंद्रीत शहरी भागात ३० जागा आहेत, त्या जागांवरतीही रिअल इस्टेटचा प्रभाव आहे. या ३० पैकी १५ जागा काँग्रेसने, ११ जागा भाजपने आणि ४ जागा जनता दलाने जिंकल्या. या ३० जागांवरील उमेदवार दृश्य-अदृश्य स्वरूपात रिअल इस्टेटशी संबंधित होते. त्यामुळे भाजप, काँग्रेस, जनता दल या तीनही पक्षांवर रिअल इस्टेटचा प्रभाव होता. या तीन पक्षांच्या मदतीने रिअल इस्टेटचे प्रतिनिधी राज्यातील राजकारण करत होते. रिअल इस्टेट आणि धाकधपटशाही यांचा संबंध जवळचा असतो. याचाही परिणाम या निवडणुकीमध्ये दिसून आला. या निवडणुकीमध्ये ८८३ उमेदवार करोडपती होते (३५ टक्के). त्यामध्ये भाजपचे २०८, काँग्रेसचे २०७, जनता दल व अपक्ष प्रत्येकी १९९ उमेदवार कोट्याधीश होते. तर ६४५ उमेदवारांवर फौजदारी गुन्हे दाखल झालेले आहेत. ही माहिती कर्नाटक इलेक्शन वॉच आणि असोसिएशन फॉर डेमॉक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) च्या अहवालात प्रसिद्ध करण्यात आली आहे. या तपशिलाचा अर्थ म्हणजे कर्नाटक विधानसभा निवडणुकीवर रिअल इस्टेट आणि रिअल इस्टेटशी संबंधित धाकधपटशाहीचा विलक्षण प्रभाव पडलेला दिसतो.

## प्रचाराचे सूत्र काँग्रेसविरोधी

भाजप आणि जद यांच्या प्रचाराचे सूत्र काँग्रेसविरोधी होते. नरेंद्र मोदी यांनी भाजपच्या जागा खेचून आणण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडली. कारण मोदी यांनी घेतलेल्या सभांमुळे २५ ते ३० जागांवर फरक पडला. मोदी यांनी प्रचारामध्ये सिद्धरामय्या यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले. त्यांचे सरकार 'सिधा रूपया सरकार तसेच १० टक्के कमिशन घेणारे सरकार' आहे असे म्हटले. पी. गुरूराज, आश्विनी पोनप्पा या स्थानिक खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय लौकिक मिळविला. तर स्थानिक राज्यकर्ते भ्रष्टाचारात सुवर्णपदक विजेते अशी टीका त्यांनी केली. बंगळुरू माहिती तंत्रज्ञानाचे महत्त्वाचे केंद्र होण्यासाठी तरुणांनी मेहनत घेतली. मात्र काँग्रेस सरकारने या शहराची दूर्दशा केली आहे. बंगळुरूचा आंतरराष्ट्रीय लौकिक राज्य सरकारने संपविला आहे. केंद्र सरकारने कर्नाटकातील स्मार्ट सिटींसाठी ७ शहरांना ८३६ कोटी रूपये दिले. परंतु यापैकी केवळ १२ कोटी खर्च केले गेले. तसेच कर्नाटक सरकार शेती व शेतकऱ्यांबाबत गंभीर नाही. शेतकऱ्यांचे कल्याण करणे ही या सरकारने आपली प्राथमिक जबाबदारी समजली नाही. सरकारने कोरडे तलाव बिल्डरांना देऊन टाकले. प्रधानमंत्री पीकविमा योजनेची राज्यात अंमलबजावणी होत नाही. एकूणच कर्नाटक सरकारने शेतकऱ्यांचे अहित करणारी धोरणे आखली, असा प्रचार नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसच्या विरोधात केला होता. तसेच भाजप किसान मोर्चा ही कर्नाटकमधील भाजपची शेतकऱ्यांसंबंधी काम करणारी संघटना आहे.

या संघटनेने प्रचारामध्ये सक्रिय भाग घेतला आणि मोदींचे मुद्दे तळागाळापर्यंत पोहोचवले. तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर भाजपने लक्ष केंद्रीत केले होते. यामुळे शेतकरी वर्गात भाजपबद्दल विरोधाची भूमिका फार तीव्र राहिली नाही. परंतु सिद्धरामय्या सरकार आणि शेतकरी यांच्यामध्ये अंतराय निर्माण करण्यासाठी म्हादई नदीच्या पाणीवाटपाचा मुद्दा अमित शहांनी प्रचारात मांडला. एकूणच नरेंद्र मोदी, अमित शहा यांनी प्रचारामध्ये राज्यसरकारच्या अपयशांवर भर दिला. राज्य-सरकारच्या विरोधात जनमत नव्हते. परंतु या प्रचारामुळे राज्यसरकारच्या शासन व्यवहाराबद्दल जनतेत संभ्रम निर्माण झाला. त्याचा फटका काँग्रेसला बसला.

## विभागनिहाय निवडणुकीचे चित्र वेगवेगळे

मुंबई कर्नाटक विभागात ५० जागा आहेत. हा विभाग एकूण चार जिल्ह्यांचा मिळून तयार झालेला आहे. बेळगांव, धारवाड, विजापूर, उत्तर कर्नाटक हे चार जिल्हे मुंबई कर्नाटक विभागातील आहेत. हा विभाग आर्थिकदृष्ट्या म्हैसूर विभागाच्या तुलनेत मागास विभाग आहे. तसेच येथे महाराष्ट्र एकीकरण समिती सातत्याने कृतीशील आहे. या विभागात ५० पैकी १७ जागा काँग्रेस पक्षाने जिंकल्या. परंतु निम्यापेक्षा जास्त जागा भाजपने जिंकल्या आहेत (३० जागा). काँग्रेसच्या या विभागातील जागा कमी झाल्या. तर भाजपच्या जागा दुपटीपेक्षा जास्त वाढल्या. जदचीदेखिल या विभागात १ जागा वाढली. महाराष्ट्र एकीकरण समितीचा या विभागात मात्र पराभव झाला. सीमाप्रश्न लढ्याचा एक भाग म्हणून समिती निवडणुका लढवत होती. परंतु समितीचा पराभव झाला. मराठी भाषा, अस्मिता आणि स्वाभिमान या तीन मुद्यांना निवडणुकीच्या माध्यमातून समितीने जनतेमध्ये आणले. या तीन मुद्यांवर मराठी जनतेला समिती संघटित करते. परंतु गेल्या दहा वर्षांनंतर महाराष्ट्र एकीकरण समितीचा पराभव झालेला दिसतो. बेळगांव दक्षिण, बेळगांव ग्रामीण व खानापूर मतदारसंघात समितीचे सदस्य पराभूत झाले. याचे मुख्य कारण अधिकृत उमेदवाराविरोधी समितीमधूनच झालेली बंडखोरी हे होते. याशिवाय समितीच्या विरोधात धन आणि दंडशक्तीचा वापर केला गेला, अशी टीकाही केली जात आहे. त्यापुढे समितीचे उमेदवार टिकले नाहीत. गेल्या वेळी बेळगांव दक्षिण आणि खानापूर या दोन मतदारसंघात समितीचे उमेदवार निवडून आले होते. परंतु यावेळी समितीचे हे बालेकिल्ले ढासळले (सकाळ, १६ मे, २०१८). यामुळे या विभागात भाजप वरचढ ठरला.

हैद्राबाद कर्नाटकमध्ये बिदर, गुलबर्गा, रायचूर, कोप्पल, यादगीर या पाच जिल्ह्यांचा समावेश होतो. या विभागात ४० विधानसभेच्या जागा आहेत. ४० पैकी २१ जागा काँग्रेसने जिंकल्या. म्हणजेच निम्यापेक्षा जास्त जागा काँग्रेस पक्षाने मिळविल्या. तेथे तेलगू भाषिक समूह आहे. या समूहाने भाजपला मते देऊ नयेत अशी तेलंगणा समितीची भूमिका होती. भाजपने गेल्या निवडणुकीच्या तुलनेत उठावदार कामगिरी केली. कारण या विभागात भाजपच्या १० जागा वाढल्या. त्यामुळे भाजपला ४० पैकी १५ जागा मिळाल्या. काँग्रेसच्या मात्र या विभागात २ जागा कमी झाल्या. जदची १ जागा या विभागात कमी झाली. जदला ४ जागा मिळाल्या. थोडक्यात या विभागात काँग्रेस पक्षाची फार मोठी घसरण झाली नाही. परंतु भाजपने उठावदार कामगिरी केली.

बंगळूरू शहरामध्ये २८ जागा आहेत. परंतु बंगळूरू शहर भागाच्या बाहेर २ शहरी जागा आहेत. या विभागात काँग्रेस विरोधी भाजप अशी सरळ द्वीधृवी राजकीय स्पर्धा झाली. येथे जद हा तिसरा पक्ष मात्र शहरी भागात फार प्रभावी नव्हता. या ३० जागांपैकी काँग्रेस पक्षाला निम्म्या जागा जिंकता आल्या. तर भाजपानेदेखिल शहरी भागात ११ जागा जिंकल्या. भाजपाचे शहरी भागात २० पेक्षा जास्त जागा जिंकण्याचे

ध्येय होते. परंतु काँग्रेसची शहरी भागात कामगिरी भाजपच्या तुलनेत जास्त उठावदार झाली तर भाजपची घसरलेली आहे. शिवाय गेल्या निवडणुकीच्या तुलनेत भाजपची कामगिरी अधिकच घसरलेली आहे. जदची कामगिरी शहरी भागातील गेल्या निवडणुकीच्या तुलनेत जास्त उठावदार झाली. कारण जदची या विभागात १ जागा वाढली आहे.

जुन्या म्हैसूर विभागालाच म्हैसूर-कर्नाटक किंवा दक्षिण कर्नाटक असे म्हटले जाते. या विभागामध्ये वोक्कलिग या जातीचे वर्चस्व आहे. ही जात या विभागातील वर्चस्वशाली आहे. या विभागात ५७ जागा आहेत. जदने या भागातील निम्म्या जागांवर विजय मिळविला (५७ पैकी २८). यामुळे काँग्रेस पक्षाच्या ८ जागा या विभागातील कमी झाल्या. भाजपची या विभागातील कामगिरी मागच्या विधानसभेपेक्षा दुप्पटीपेक्षा अधिकने सुधारली. भाजपला ५७ पैकी ११ जागा मिळाल्या. या विभागात त्रिकोणी स्पर्धा होती, असे चित्र वरवर दिसते. परंतु काँग्रेस विरोधी इतर अशी स्पर्धा या विभागात झाली (भाजप-जद). भाजप-जदची अदृश्य युती या विभागात होती. त्यामुळे जदला या विभागात चमकदार कामगिरी करता आली. या विभागातील मंड्या जिल्ह्यात आठ जागा आहेत. त्या सर्व जागा जदने जिंकल्या (कृष्णराजनगर, कृष्णराजपेठ, नागमंगल, मंड्या, मेलुकोटे, श्रीरंगपट्टम, मड्डूर, मळवळ्ळी).

मध्य कर्नाटकामध्ये विधानसभेच्या २१ जागा आहेत. २१ पैकी १७ जागा भाजपने जिंकल्या. भाजपच्या या भागात १६ जागा वाढल्या. त्यामुळे भाजपच्या राज्यातील यशाचे गमक या विभागात दडलेले दिसते. काँग्रेस पक्षाच्या या विभागात १४ वरून थेट ४ वर जागा आल्या. या विभागातील ही काँग्रेसची अत्यंत ठिसूळ कामगिरी ठरली. जदला या विभागात एकही जागा मिळाली नाही. या विभागात भाजप विरोधी काँग्रेस अशी स्पर्धा झाली. या स्पर्धेत भाजपने एकमुखी वर्चस्व मिळविले. येथील लिंगायत या शेतकरी समूहाचा भाजपला पाठिंबा मिळाला. शिवाय या विभागात लिंगायत समाजातून रिअल इस्टेटमध्ये गेलेल्या समूहांचा देखिल भाजपला पाठिंबा मिळाला. त्यामुळे भाजपची कामगिरी वर्चस्ववाचक आहे.

किनारपट्टी विभागात २४ जागा आहेत. या विभागातील भाजपने सर्वाधिक जागा जिंकल्या (२० जागा). तर काँग्रेसने केवळ ४ जागा जिंकल्या. काँग्रेसची येथे गेल्या निवडणुकीच्या तुलनेत १० जागांनी घसरण झाली. या विभागात भाजप विरोधी काँग्रेस अशी स्पर्धा झाली. या स्पर्धेत काँग्रेसचा पराभव झाला. या विभागात हिंदुत्वाचा मुद्दा प्रभावी ठरला.

म्हैसूर कर्नाटक आणि मध्य कर्नाटक या दोन भागात या दोन वर्चस्वशाली समूहांचा समझौता असावा असा निवडणूक निकालाचा अर्थ लागतो. म्हैसूर कर्नाटकात जदला सर्वात जास्त जागा मिळाल्या व मध्य कर्नाटकात भाजपला जास्त जागा मिळाल्या. या तथ्यामधून भाजप आणि जद यांच्यामध्ये अंतर्गत अदृश्य समझौता होता. असे म्हणण्यास हा निकाल समर्थन करतो. यामुळे या दोन वर्चस्वशाली समूहांमध्ये सत्तास्पर्धा असूनही या दोन समूहांनी काँग्रेस पक्षास विरोध केला. त्यासाठी त्यांच्यासाठी समझौता घडून आला. तर हैद्राबाद-कर्नाटक, म्हैसूर कर्नाटक आणि बंगळूरू शहर या तीन विभागात काँग्रेसने भाजपपेक्षा जास्त जागा जिंकल्या. या तीन विभागातील स्पर्धेतदेखिल काँग्रेसची कामगिरी भाजपपेक्षा चांगली राहिली. परंतु मध्य कर्नाटक आणि किनारी कर्नाटकमध्ये काँग्रेसची मात्र मोठीच घसरण झाली. तर भाजपने या दोन विभागात जोरदार शिरकाव केला. भाजप हा पक्ष राज्यातील सर्व भागांमध्ये पसरलेला पक्ष ठरला. परंतु जद हा पक्ष मात्र केवळ म्हैसूर कर्नाटक केंद्रीत राहिला. म्हणजेच या पक्षाची ताकद एका विभागापुरतीच मर्यादीत आहे. या तुलनेत भाजपची ताकद राज्याच्या सर्व भागांमध्ये विभागलेली दिसून येते. मध्य कर्नाटक आणि किनारी कर्नाटक वगळता काँग्रेस पक्षदेखिल राज्यात सर्वत्र आधार

असलेलाच दिसून येतो. जागांचा निकष वगळता मतदानाच्या निकषावर काँग्रेस पक्ष राज्यातील सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला. म्हणजेच जागा जिंकण्यामध्ये भाजप राज्यातील सर्वात मोठा पक्ष तर मतदान स्वतःकडे वळवून घेण्यामध्ये काँग्रेस हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला. यामुळे काँग्रेसचा

### विधानसभा निवडणुकीतील पक्षनिहाय मतांची टक्केवारी

| पक्ष/निवडणूक वर्ष | २०१८ | २०१३ | २००८ |
|---|---|---|---|
| काँग्रेस | ३८ | ३४.५९ | ३५.१३ |
| भाजप | ३६.२ | २० | ३३.८६ |
| धजद | १८.३ | १९.३ | १९.१४ |

(संदर्भ – निवडणुक आयोगाचे संकेतस्थळ)

पूर्ण पाडाव झालेला नाही. तसेच भाजपनेही कर्नाटकची निवडणूक जिंकलेली नाही, असे चित्र पुढे आले. कमीत कमी मतांवर जास्तीत जास्त जागा भाजपने जिंकल्या. हे सूत्र भाजपला जुळविता आले. परंतु जास्तीत–जास्त मतांवर काँग्रेसला कमीत–कमी जागा मिळाल्या. म्हणजेच काँग्रेसला मते आणि जागा निवडून आणण्याचे सूत्र जुळविता आले नाही. हा भाजप आणि काँग्रेसमधील मोठा फरक दिसतो.

कर्नाटकच्या या विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेस, भाजप व जद या राजकीय पक्षांमध्ये स्पर्धा झाली. यामध्ये भाजपने सर्वात जास्त जागा मिळविल्या. तर काँग्रेसने सर्वात जास्त मते मिळविली. कोणत्याच राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने कर्नाटकमध्ये त्रिशंकु अवस्था निर्माण झाली व निकालदेखील अनिर्णित राहिला.

### विभाग, पक्षनिहाय निवडणुकीतील कामगिरी

| विभाग | काँग्रेस | | भाजप | | जद | | इतर | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१८ | २०१३ | २०१८ | २०१३ | २०१८ | २०१३ | २०१८ | २०१३ | २०१८ | २०१३ |
| मुंबई-कर्नाटक | १७ | ३१ | ३० | १३ | ०२ | ०१ | ०१ | ०५ | ५० | ५० |
| हैद्राबाद- कर्नाटक | २१ | २३ | १५ | ०५ | ०४ | ०५ | ०० | ०७ | ४० | ४० |
| बंगळूरू केंद्रीत शहरी भाग | १५ | १५ | ११ | १२ | ०४ | ०३ | ०० | ०० | ३० | ३० |
| म्हैसूर - कर्नाटक | १७ | २५ | ११ | ०४ | २८ | २३ | ०१ | ०५ | ५७ | ५७ |
| मध्य कर्नाटक ०४ | १४ | १७ | ०१ | ०० | ०४ | ०० | ०२ | २१ | २१ | |
| कोस्टल विभाग | ०४ | १४ | २० | ०५ | ०० | ०२ | ०० | ०३ | २४ | २४ |


**वाटसरूची वर्गणी पाठवण्याचा / पत्रव्यवहाराचा नवा पत्ता**

परिवर्तनाचा वाटसरू

५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ, फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११

भ्र. ७७७६९०२२६७